|| राष्ट्रदेवाः भवेम ||

# ज्ञान प्रबोधिनी
# शैक्षणिक साधन केंद्र

## ई-प्रशिक्षक

वर्ष १ : अंक ८ / जून २०१४




## उपासना

हरिः ॐ। ॐ। ॐ।

शक्ती मंत्र

परब्रह्म शक्ती स्फुरो हिंदुत्वामध्ये.......।। (५ वेळा)

परब्रह्म शक्ती स्फुरो प्रबोधिनीमध्ये.....।। (५ वेळा)

गायत्री मंत्र

ॐ। ॐ। ॐ।

ॐ भूः । हे पृथ्वी

ॐ भुवः । हे अंतरिक्ष

ॐ स्वः । हे सूर्य

ॐ महः । हे कोटिसूर्य

ॐ जनः । हे आकाशगंगा

ॐ तपः । अनंत आकाशगंगा

ॐ सत्यम् । हे परब्रह्म

ॐ तत्सवितुर्वरेण्यम् भर्गो देवस्य धीमहि ।

धियो यो नः प्रचोदयात्।।

या परब्रह्माच्या, देवाच्या, श्रेष्ठ तेजाचे ध्यान करितो.
अमुच्या बुद्धीला तो प्रचोदना देवो.

ऐका


www.erc-pune.org



वर्षारंभ : वर्षाचा आरंभ उपासनेने करू या !



कार्यकेंद्रित शिक्षण



पुस्तक परिचय

# संपादकीय

सप्रेम नमस्कार .

नवीन वर्ष – नव्या आकांक्षा, नवीन आव्हाने, नवीन उद्दिष्टे. वर्षारंभी संकल्पांची नवीन पालवी लेऊन नववर्षाच्या स्वागताला आपण तयार आहात. काही शाळांमध्ये या स्वागताची पूर्वतयारी म्हणून अभ्यास शिबिरे, प्रशिक्षण वर्ग यांची सुरुवात झाली असेल.

काही तरी भव्य स्वप्न पाहणे आणि ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी बेधुंद होऊन काम करणे हेच माणसाचे वेगळेपण आहे. मी काय नव्याने शिकणार, माझ्यात कोणता बदल घडवून आणणार याचा योग्य विचार वर्षारंभी केला तर त्याप्रमाणे वर्षभर काम करण्याची शक्यता निर्माण होते.

स्वत:च्या प्रगतीची दिशा ठरविण्याचा अनुभव आपण विद्यार्थ्यांना देऊ शकू का? दुसऱ्या कुणीतरी सांगितले म्हणून मी अभ्यास करतो, यापेक्षा मी ठरवले त्यासाठी अभ्यास केला हे महत्त्वाचे .ज्ञान प्रबोधिनीत आपण यासाठी वर्षारंभ उपासना करतो. वर्षारंभी उद्दिष्ट ठरवायचे, त्याप्रमाणे वर्षभर प्रयत्न करायचे आणि वर्षाच्या शेवटी त्याचा आढावा घ्यायचा . शिकण्याची प्रेरणा वाढण्यासाठी हा महत्त्वाचा संस्कार आहे.

छोट्या छोट्या संकल्पांतून, कृतीतून मोठ्या स्वप्नांचे दर्शन होते. विद्यार्थ्यांच्या मनातील अभ्यासाबद्दलची अनास्था दूर करण्यासाठी या वर्षारंभ संकल्प ग्रहणाचा उपयोग होतो.असे वैयक्तिक आणि सामूहिक संकल्प आपल्या शाळेचा गुणवत्तापूर्ण विकास घडवून आणतील हा विश्वास वाटतो.

दर वर्षी अशी उद्दिष्टे ठरवून विद्यार्थ्यांनी अभ्यास केल्यास त्यांच्यात अभ्यासासाठी आवश्यक जिज्ञासू विद्यार्थीवृत्तीची वाढ होऊ शकेल.

असे नवे संकल्प, नवीन ध्येये, नवीन आव्हाने ठरवण्यासाठी आपल्या सर्वांना शुभेच्छा!

सस्नेह,<br>
प्रशांत दिवेकर<br>
कार्यकारी संपादक<br>
ई प्रशिक्षक



# वर्षारंभ : वर्षाचा आरंभ उपासनेने करू या !

कृषि संस्कृतीमध्ये पाऊस काळाला मोठेच महत्त्व असते. त्यामुळे ऋषिमुनींनी आपल्या आश्रमांमध्ये कृषिकार्य हे शिक्षणाचे अंग मानलेले होते. म्हणूनच पाऊसकाळ सुरू होतो तेव्हा ग्रंथ बांधून ठेवण्याची व शेतीच्या कामास लागण्याची प्रथा होती. चार महिन्यांचा हा काळ निसर्गाच्या सान्निध्यात, पाटापाण्यात, काबाडकष्ट करत घालवून गुरु शिष्य चातुर्मास साजरा करत असत. पाऊस कमी झाला. श्रावण मास आला की पुन:श्च वेदांची पाने पुढे घेऊन ज्ञानसाधना सुरू होत असे. जीर्ण झालेली उत्तरीये, यज्ञोपवीते बदलून नवी धारण केली जात.

सुट्टीनंतर पुन:श्च वेदारंभ करणे म्हणजे उपाकर्म किंवा वर्षारंभ होय. हल्लीचे शालेय शैक्षणिक वर्ष हे जूनमध्ये सुरू होते. काहीशा खंडानंतर पुन:श्च अभ्यासाला लागताना मन:पूर्वक संकल्प करून वर्षाचा आरंभ मोठ्या उत्साहाने करावा यासाठी ज्ञान प्रबोधिनीमध्ये वर्षारंभ समारंभ गेली अनेक वर्षेकरण्यात येत आहे. यावेळी वेद-उपनिषदे, गीता व संतवचने यांच्या मधील निवडक भागाचे सामूहिक, सार्थ गायन अत्यंत गंभीरपणे करण्यात येते. विद्याव्रताच्या यशासाठी विद्यार्थ्याने आपल्या आहार-विहारादी गोष्टींवर संयम ठेवावा म्हणून औचित्यपूर्ण अशा पद्यांचे गायन झाल्यावर; आमचे सारे ज्ञान, सामर्थ्य व जीवन हे देशकार्यार्थ उपयोगी ठरावे असा संकल्प करण्यात येतो. संघटितपणे हे व्हावे असे गद्य प्रार्थनेमध्ये स्पष्टपणे म्हणण्यात आले आहे.

शिक्षण क्षेत्रात सर्वत्र प्रचलित व्हावा असा हा वर्षारंभ उपक्रम आहे. सर्व प्रिय अशा संगीत - नाट्य - नृत्यादि कार्यक्रमांना 'सांस्कृतिक' या संज्ञेने ओळखण्यात येते. वर्षारंभ, विद्याव्रतग्रहण व वर्षान्त हे तीनही उपक्रम शैक्षणिक, सांस्कृतिक, पारंपारिक अथवा सामाजिक या संज्ञेस पात्र ठरणारे आहे. त्या अर्थाने ते आधी मराठी भाषिकांनी आपलेसे करावेत असे आहेत. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात सर्वांनीच याचा प्रयोग करून पाहावा. वाटल्यास त्यात स्वप्रतिभेने काही भर टाकावी पण विद्येच्या क्षेत्रात विद्येवर निष्ठा वाढविणारे, समाजाशी बांधिलकी उत्पन्न करणारे, देशाच्या वैभवाचे ध्येय सर्वांसमोर ठेवणारे असे उपक्रम आपापल्या शिक्षणसंस्थेत सुरू करावेत अशी तळमळ आहे.

जून २०१४ मध्ये शाळा सुरू होतील. पहिल्याच दिवशी नाही जमले तरी सोयीचा दिवस पाहून, पूर्वतयारी करून आपल्या शाळेत वर्षारंभ उपासना घेणे शक्य होईल. उपासनेतील ठळक ठशातील गद्य-पद्य भाग अध्वर्यू म्हणून बसणाऱ्या व्यक्तीने शक्यतो तालसुरात सांगावा व पाठोपाठ तो सर्वांनी तसाच म्हणावा. बाकीचा अर्थाचा वा अन्य भाग अध्वर्यूंनेच सर्वांना उद्देशून वाचावा. सर्व विद्यार्थी ओळीत, शिस्तीत बसलेले असावेत. हालचाल नसावी. गांभीर्यपूर्ण वातावरणासाठी उदबत्त्या, धूप लावावा. समोर ॐ ची प्रतिमा, सरस्वतीची प्रतिमा, समई इ. ठेवावे. उपासना सांगणारा म्हणजे अध्वर्यू सर्वांना दिसेल अशा जागी बसलेला असावा. त्याचे बोलणे सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक तर ध्वनिवर्धक व्यवस्था असावी. मुले पूर्वेकडे तर अध्वर्यू उत्तरेकडे तोंड करून बसलेले असतील तर उत्तम पण जागेच्या रचनेप्रमाणे यात आवश्यक तो फेरफार खुशाल करावा. कार्यक्रमाच्या ठरलेल्या वेळेपूर्वी ५ मिनिटे सर्वजण स्थानांवर बसलेले असतील हे प्रमुखांनी पाहावे. ठीक योजलेल्या वेळी अध्वर्यूंने 'हरि। ओम्' म्हणून उपासनेस प्रारंभ करावा. सर्व उपस्थितांनी पाठोपाठ ठळक ठशातील भाग म्हणावा. शक्य झाल्यास उपासनेचा कागद प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात देता आल्यास अधिक उत्तम.

उपासना झाल्यावर छोटीशी सभा व्हावी. त्यामध्ये वर्गप्रतिनिधींनी वर्षभरात वर्गाची म्हणून काही उद्दिष्टे, संकल्प सर्वांसमोर मांडावेत.प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शनपर आशीर्वाद द्यावेत. काही विद्यार्थ्यांनी त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांना फुले देऊन, नमस्कार करून त्यांचे नवीन वर्षामध्ये मन:पूर्वक स्वागत करावे व कार्यक्रम संपवावा.

संपूर्ण शाळेचा मिळून हा कार्यक्रम होऊ न शकल्यास निदान ८ वी, ९ वी व १० वी च्या वर्गांचा तरी हा कार्यक्रम आवर्जून व्हावा. सभासदांनी किमान आपल्या वर्गशिक्षकांशी बोलून शाळेतील एखाद्या तासाला वर्गामध्ये किंवा सभागृहात हा कार्यक्रम घडवून आणावा. नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांकडून कोणते संकल्प करवून घ्याल?

उदाहरणादाखल काही व्यक्तिगत व काही सामूहिक संकल्प दिले आहेत. त्यातले या नव्याने सुचतील त्यापैकी कोणतेही तीन संकल्प प्रत्येकाने करावेत. हे संकल्प पूर्ण झाले की नाहीत हे वर्षाच्या शेवटी तपासून पाहता यावे म्हणून ते सुस्पष्ट, मोजता येण्यासारखे व नेमके असावेत. संकल्पातील संख्यात्मक उद्दिष्टे प्रत्येकाने स्वत:साठी योग्य तेबदल करून निश्चित करावी.

प्रा. यशवंत लेले,
संस्कृत संस्कृती संशोधिका,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

## व्यक्तिगत संकल्प

- वर्षातील ३०० दिवस तरी रोज किमान एक तास खेळ, व्यायामासाठी वापरीन
- रोज १० सूर्यनमस्कार घातल्याशिवाय अन्नग्रहण करणार नाही.
- रोज ५ मिनिटे स्वस्थ, शांत बसून ध्यान करीन. स्वत:विषयी चिंतन करीन.
- वर्षभरात मिळून १००० पाने अवांतर वाचन करीन.
- वर्षभर घरातील किमान ५ कामे ठरवून करीन.
- रोज दैनंदिनी लिहीन.
- नियमित अभ्यासक्रमातून गेल्या वर्षापेक्षा अधिक गुण मिळवीन.
- विशिष्ट कला- कौशल्ये यामध्ये प्रगती करीन.
- भारतीय लिपीत स्वाक्षरी करीन.

## सामूहिक संकल्प

- वर्गाची गुणांची सरासरी ५ टक्क्याने वाढवू.
- शाळेतील एक सूचना फलक वर्षभर उत्तमरीतीने सजवू, वापरू.
- वर्गातील सर्वांनी मिळून वर्षभरात एक लाख सूर्यनमस्कार घालू. १० हजार किलोमीटर पळू, २५ हजार तास अभ्यास करू. ५० हजार पाने वाचू.

## वर्षारंभ उपासना

**अध्वर्यू आणि उपासक** :हरि: ॐ ॐ ॐ

**अध्वर्यू** : आज वर्षारंभ समारंभ आहे. विद्येची देवता जी सरस्वती तिच्या चिंतनाने आरंभ करू या.

**या कुन्देन्दु-तुषार-हार-धवला या शुभ्रवस्त्रावृता ।**
**या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ।**
**या ब्रह्माऽच्युतशंकर-प्रभृतिभि:देवै: सदा वन्दिता ।**
**सा मां पातु सरस्वती भगवती नि:शेष-जाड्याऽ पहा ।।**

**अर्थ :** कुंदपुष्पे, चंद्रमा, हिमकणिका आणि मौक्तिकमाळा यांच्याप्रमाणे जिची कांती धवल आहे; जिने शुभ्र वस्त्रे धारण केलेली आहेत; जिच्या हाती उत्कृष्ट वीणादंड विलसत आहे; जी शुभ्र कमलासनावर आरूढ झालेली आहे; तिला ब्रह्मा, विष्णू, महेश इत्यादी देवता नित्य वंदन करतात; - ती बुद्धीचे मालिन्य समूळ धुऊन टाकणारी, भगवती, देवी सरस्वती, माझे रक्षण करो.
(अध्वर्यूने सरस्वती प्रार्थना सांगावी व सर्वांनी पाठोपाठ म्हणावी. मग अध्वर्यूने प्रार्थनेचा अर्थ सांगावा.)

**अध्वर्यू आणि उपासक :** **उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्, निबोधत ।**

**अध्वर्यू आणि उपासक :** उठा, जागे व्हा आणि ध्येयसिद्धी झाल्याविना थांबू नका.

ज्ञानप्राप्तीचा सोपा मार्ग म्हणजे गुरूंच्याकडे जाणे होय. वेदांपासून चालत आलेली ज्ञानप्राप्तीचा सोपा मार्ग म्हणजे गुरूंच्याकडे जाणे होय. वेदांपासून चालत आलेली ही ज्ञानगंगा हीच साक्षात् आपली गुरू आहे. त्या गुरूदेवतेचे अंश म्हणून आपणास ज्ञानी करणाऱ्या अलौकिक गुरूंचा आदर आपण करू या. (सर्व जण हात जोडून उभे राहतात.)

**अध्वर्यू आणि उपासक :** **गुरु:ब्रह्मा गुरु: विष्णु: गुरु: देव: महेश्वर: ।**
**गुरु: साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नम: ।।**

**अध्वर्यू** :आपले गुरू ब्रह्मदेवासारखे आहेत. गुरू हेच विष्णू, गुरू हेच महेश, फार काय गुरू म्हणजेच साक्षात् परब्रह्म आहेत आणि म्हणून या गुरूंना वंदन करू या. असे गुरू आणि ज्ञानलालसा असलेले शिष्य आपण उभयता पूर्ण व्रताचरणी राहून विद्येची उपासना करू या. सर्व व्यसनांच्या पासून दूर राहू या.

**अध्वर्यू आणि उपासक :**

**व्यसनानि सन्ति बहूनि, व्यसनद्वयमेव केवलं व्यसनम् ।**
**विद्याभ्यसनं व्यसन् अथवा हरिपादसेवनं व्यसनम् ।।**

**अध्वर्यू :** व्यसने अनेक असतात, पण खरी व्यसने केवळ दोन. विद्याउपासनेचे व्यसन हे एक आणि परमेश्वर चिंतनाचे व्यसन हे दुसरे. विद्येची उपासना करीत असताना अनेक संकटे येतील पण त्यातूनही मार्ग काढून आपण सतत पुढे जात राहूया.

**अध्वर्यू आणि उपासक :**

**असतो मा सद् गमय ।**
**तमसो मा ज्योतिर्गमय ।**
**मृत्योः मा अमृतं गमय ।।**

**अध्वर्यू :** आम्हाला असत्याकडून सत्याकडे घेऊन जा; अंधकारातून प्रकाशाकडे घेऊन जा; मृत्यूतून अमृतत्त्वात घेऊन जा. विद्याभ्यास हे सुद्धा योगाचरण आहे. आपणा सर्वांना विद्याभ्यासी असे योगी व्हायचे आहे म्हणून –

**अध्वर्यू आणि उपासक :**

**नियम पाळावे जरि म्हणशील योगी व्हावे ।।धृ. ।।**
**रसनेचा जो अंकित झाला, समूळ निद्रेला जो विकला,**
**तो नर योगाभ्यासा मुकला, असे समजावे ।।१ ।।**
**रात्री निद्रा परिमित घ्यावी, भोजनातही मिती असावी,**
**शब्दवल्गना बहु न करावी, साधक जीवे ।।२ ।।**
**या परि सकलाहार–विहारी, नियमित व्हावे मनि अवधारी**
**निजरूपोन्मुख होऊनि अंतरी, चित्त मग धावे ।।३ ।।**

**अध्वर्यू :** सामुदायिक, एकत्र असे वेदांचे स्मरण, उपनिषदांचे स्मरण, परमेश्वराचे स्मरण केल्यानंतर आपल्या मनातील आकांक्षा आपण देवाला सांगू या. (येथे खालील गद्य प्रार्थना अध्वर्यूच्या पाठोपाठ विद्यार्थी म्हणतात.)

**Always bear in mind that your own resolution to succeed is more important than any other.**

**Abraham Lincoln**

**People can say whatever they want about the sport of bodybuilding, but to get prepared to do a contest or even think about doing a contest, or even to get into decent shape, it requires a certain amount of discipline, and it comes from taking a new year's resolution to a lifestyle.**

**John Cena**

**कुछ कर गुजरने के लिए**
**मौसम नही मन चाहिए**
**साधन सभी जुट जाएगे**
**संकल्प का धन चाहिये ।**

# संकल्पयुक्त प्रार्थना

राष्ट्रार्थ भव्य कृति काही पराक्रमाची।
ईर्ष्या निजांतरि धरूनि करावयाची ।।
खरोखर राष्ट्रहितार्थ
जीवनात पराक्रमाची उत्तुंग कृती घडावी
अशी तीव्र तळमळ मनात धरून
या शैक्षणिक वर्षाच्या आरंभी
आमच्या मनातील संकल्प व्यक्त करण्यासाठी
आम्ही एकत्र जमत आहोत.
हे परमात्मन् तू याचा साक्षी हो!
आमच्या दैनंदिन जीवनात
आम्ही उत्तम अभ्यास करू,
उत्तम वाचन करू, उत्तम चिंतन करू,
खूप खेळ खेळू, शरीर सुदृढ, काटक करू.
बौद्धिक, शारीरिक,
मानसिक आणि आत्मिक
सर्व प्रकारे आम्ही कार्यक्षम होऊ.
शिक्षकांच्याबद्दल नितांत आदर बाळगून
त्यांच्याकडून अधिकाधिक विद्या आम्ही ग्रहण करू.
वर्गमित्रांचे गुणग्रहण करत,
परस्पर विश्वास अन् स्नेह वाढवत
आनंदाने, सामर्थ्याने
अनेक प्रकारचे अनुभव अंत:करणपूर्वक घेऊ.
देशाच्या परिस्थितीबाबत
आमची संवेदना आम्ही सतत जागृत ठेवू.
तिला अनुसरून योग्य तो प्रतिसाद देऊ.
एकट्याच्या कर्तृत्वाच्या मर्यादा लक्षात घेऊन
सामूहिक शक्ती वाढविण्याचा
आम्ही संकल्प करी आहोत.
विद्या, संपत्ती आणि नीती यांनी
आमचे राष्ट्र समृद्ध व्हावे म्हणून
जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात
आम्ही संघटना घडवू
आमची मने संघटनेला आवश्यक अशी
लवचिक अन् जुळवून घेणारी,
परस्परांना प्रेमाने बांधणारी,
सर्वांच्या व्यक्तिवैशिष्ट्यांचा आदर करीत
सर्वांच्या उज्ज्वल भविष्यासाठी
एकत्रितपणे स्वप्ने पाहणारी अशी होवोत.
आमच्या प्रयत्नांनी अन् वडिलधाऱ्यांच्या आशीर्वादानी
आम्ही केलेले व्यक्तिगत व सामूहिक संकल्प पूर्ण होवोत.
आमचा कण न् कण आणि क्षण न् क्षण
तुझ्याच इच्छेने सार्थकी लागू दे !
हे परमेश्वरा ! तुझ्या मंगल आशीर्वादाने
ते सर्व घडू दे!

यानंतर दोन मिनिटे चिंतन करावे. पुढील वर्षीचे संकल्प, निश्चय मनाशी पक्के करावेत. उपासनेचा शेवट पुन्हा त्रिवार ॐकाराने व्हावा.

# वर्षारंभ संकल्प

## वैयक्तिक संकल्प

१. आहार, व्यायाम : ______________________

२. अभ्यास : ______________________


३. छंद, आवड : ______________________

४. वर्तन : ______________________

५. वाचन : ______________________

**आपले संकल्प हेतूपूर्वक, मोजता येण्याजोगे, व्यवहार्य आणि वेळेच्या मर्यादेत पूर्ण होणारे असावेत.**

**वर्गशिक्षकांची स्वाक्षरी** **पालकांची स्वाक्षरी**




(१०)

वर्षारंभ उपासना

विद्यार्थ्याचे नाव - सुदर्शन महेश चंद्रात्रे
इयत्ता - आठवी (८वी) तुकडी - मुले
मार्गदर्शक - मृदुला ताई पाठक
वर्गबैठकीचा दिनांक - २३/०६/२०१२
व्यक्तिगत संकल्प -


| | |
|---|---|
| १. | स्वा. वि. दा. सावरकर यांची १० पुस्तके वाचीन. |
| २. | दररोज १२ सूर्यनमस्कार घालीन. |
| ३. | दररोज किमान ४ तास अभ्यास करीन. |



वर्षारंभ उपासना

विद्यार्थ्याचे नाव - अश्विनी सुजित कुलकर्णी
इयत्ता - १० वी तुकडी - मुली
मार्गदर्शक - मुकुलिकाताई शत्ते
वर्गबैठकीचा दिनांक - १२-६-२०१४
व्यक्तिगत संकल्प -


| | |
|---|---|
| १. | मी वेळ पाळेन. सगळ्या ठिकाणी वेळेवर पोहचेन व काम पूर्ण करेन. |
| २. | मी इतरांमधल्या चांगल्या गोष्टी समजून आत्मसात करेन. |
| ३. | आठवड्याचे नियोजन करून त्याप्रमाणे रोज ३ तास अभ्यास करेन. |



वर्षारंभ उपासना

विद्यार्थ्याचे नाव - साहिल दीक्षित
इयत्ता - ८वी तुकडी - मुले
मार्गदर्शक - मृदुला पाठक (मृदुला ताई)
वर्गबैठकीचा दिनांक - २३/०६/१२.
व्यक्तिगत संकल्प -


| | |
|---|---|
| १. | ४० पुस्तके वाचेन. |
| २. | कमित-कमी वेळ T.V. बघेन. |
| ३. | वर्षभरातील सर्व उपासना नीट करेन. |



वर्षारंभ उपासना

विद्यार्थ्याचे नाव - देविका संजीव गुमास्ते
इयत्ता - १० वी तुकडी - मुली
मार्गदर्शक - प्रा. मुकुलिका शत्ते
वर्गबैठकीचा दिनांक - 12 / 06 / 2014
व्यक्तिगत संकल्प -


| | |
|---|---|
| १. | दररोज १२ सूर्यनमस्कार घालीन. |
| २. | आठवड्यातून २५ तास (किमान) स्व-अध्ययन करीन. |
| ३. | एखाद्या सामाजिक समस्येचा अभ्यास करीन. |



अध्यापक अभिप्राय -

१. विचारपूर्वक संकल्प केले व ते पूर्ण केले.
२. विचारपूर्वक संकल्प केले व ते अंशतः पूर्ण केले.
३. विचारपूर्वक संकल्प केले व ते पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.
४. संकल्प केले पण ते पूर्ण करण्याचा फारसा प्रयत्न केला नाही.
५. संकल्प करण्यात विशेष रस नव्हता व ते पूर्णही केले नाहीत.

# पुस्तक परिचय




आज आपल्या देशाला लोखंडी स्नायूंची व पोलादी नसांची गरज आहे; आज आवश्यकता आहे या विश्वाच्या गूढांचा व रहस्यांचा भेद करणाऱ्या, वाटेल त्या रीतीने आपले इष्ट साध्य करून घेणाऱ्या, वेळी गरज पडल्यास अगाध समुद्राच्या तळाशी जाऊन मृत्यूशी मुकाबला करणाऱ्या व जिला कोणीही रोधू शकणार नाही अशा दुर्दम्य इच्छाशक्तीची. 'माणूस' घडविणारा धर्म आपल्याला हवा आहे. 'माणूस' निर्माण करणारे सिद्धान्त आपल्याला हवे आहेत. सर्व तऱ्हांनी 'माणूस' निर्माण करणारे शिक्षण आपल्याला हवे आहे.

– स्वामी विवेकानंद


श्रीरामकृष्ण-विवेकानंद साहित्य आणि इतर आध्यात्मिक प्रकाशने मागविण्यासाठी लिहा.

रामकृष्ण मठ (प्रकाशन विभाग)
रामकृष्ण आश्रम मार्ग, धंतोली, नागपूर – ४४० ०१२
E-mail - rkm.nagpur@rkmpbngp.org
www.rkmathnagpur.org
(M-010) Shikshan : Rs. 15.00

निसर्गाशी सतत सख्यसंबंध ठेविल्यानेच खरे शिक्षण मिळते. अनुभव हाच आपला एकमेव शिक्षक आहे. प्रत्यक्ष अनुभवाद्वारेच आपल्याला खरेखरे ज्ञान होऊ शकते. आपण सारा जन्म बडबड केली किंवा तर्कविचार केला तरी प्रत्यक्ष अनुभव आल्याखेरीज आपल्याला सत्याचे एक अक्षरही समजायचे नाही. आपले सगळे ज्ञान अनुभवांतून निघाले आहे तर हे निश्चित आहे की जे आपण अनुभवले नाही ते समजणे व त्याची कल्पना करणे शक्य नाही.

श्रीरामकृष्ण-विवेकानंद साहित्य आणि इतर आध्यात्मिक प्रकाशने मागविण्यासाठी लिहा.

रामकृष्ण मठ (प्रकाशन विभाग)
रामकृष्ण आश्रम मार्ग, धंतोली, नागपूर – ४४० ०१२
E-mail - rkm.nagpur@rkmpbngp.org
www.rkmathnagpur.org
(M-206) Adarsh Shikshan : Rs. 25.00



## हाताने काम करत करत शिकणे

शिक्षणातून विकास आणि विकास कामांतून शिक्षण या शिक्षणाच्या संकल्पनेतून गेली २९ वर्षे विज्ञान आश्रम काम करत आहे. मन-मेंदू-मनगट यांच्या समन्वयाने शिक्षण चांगले व्हायला मदत होते हे महात्मा गांधी यांनी सांगितले होते. जीन पियाजे, रविंद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, महात्मा गांधी यांच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव विज्ञान आश्रमाच्या कामात दिसून येतो. हाताने काम करत करत शिकणे हे विज्ञान आश्रमाच्या शिक्षणाचे पहिले सूत्र आहे. कोणतीही गोष्ट आपण हाताने काम करूनच शिकतो. विज्ञान आश्रमात NIOS ची मान्यता असलेला DBRT हा कोर्स निवासी चालविला जातो. या अभ्यासक्रमात विद्यार्थी बहुविध कौशल्यांचे चार विभागांत (शेती-पशुपालन, अभियांत्रिकी, ऊर्जा-पर्यावरण, गृह-आरोग्य) शिक्षण घेतात.

**कौशल्य विकास व उद्योजकता विकास –**

वर्षभर विद्यार्थी नवनवीन कौशल्ये शिकत स्वत:च्या क्षमता कौशल्ये ओळखून पुढे कोणता उद्योग व्यवसाय करता येईल याची चाचपणी करतात. नंतर स्वत:च्या गावी जाऊन उद्योग व्यवसाय सुरू करतात असा अनुभव आहे.शालेय शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये शिकली पाहिजेत यासाठी विज्ञान आश्रमाने ‘मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख’ हा पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम शासनाच्या मान्यतेने सुरू केला. आज १२२ हून अधिक शाळांत तो राबविला जात आहे. निदेशक हा उद्योजक असला पाहिजे हे दुसरे सूत्र असल्याने, गावातील उद्योजक किंवा कौशल्य असणारे कारागीर यात निदेशक म्हणून काम करतात. विज्ञान व गणिताचे शिक्षक समन्वयक म्हणून काम करताना विषय समजावून सांगतात. हा अभ्यासक्रम कमीत कमी खर्चाचा असल्याने कोणत्याही माध्यमिक शाळेत सुरू करता येऊ शकतो.

**स्वत:चे व समाजाचे प्रश्न सोडविणे –**

शाळेत या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून गावातील विविध समस्या सोडविण्यासाठी समाजोपयोगी सेवा दिल्या जातात. मुख्य उद्देश हा शालेय विषय मुळापासून समजून घेणे, काही कौशल्ये मिळविणे, स्वत:चे प्रश्न सोडविता येणे हा आहे.Activity Based Learning ही कार्यकेंद्री शिक्षणाची पहिली पायरी आहे. काहीतरी काम करणे, त्यातून शिकणे. मात्र शिक्षणाची दिशा स्वत:चे तसेच समाजाचे प्रश्न सोडविणे ही असली पाहिजे.

**उत्पादक कामातून शिक्षण –**

कार्यकेंद्रित शिक्षण घेताना आय.बी.टी.च्या शाळेत केलेली काही कामे पाहूया, शाळेत सौर ऊर्जा हा भाग सर्वच वर्गांना शिकवला जातो. मात्र त्यात साधनाचा किंवा कृतीचा वापर फार कमी होतो असे ध्यानात आले. सौर कुकर हे एक त्यातील साधन की ज्याचा वापर कसा करायचा हे सांगितले जाते, मात्र वापर कधीच होत नाही. मी शाळेत असताना मला हा कुकर पाहायला मिळाला नव्हता. म्हणून आय.बी.टी. च्या शाळेत सोलर कुकर तयार करायचा अस आम्ही ठरविले. बाजारात मिळणाऱ्या कुकरचा खर्च रु. ३०००/- च्या पुढे होता, तो कमीत कमी कसा करता येईल याचा विचार केला. तो लाकडाचा वापर करून कसा तयार करता येईल याचा विचार केला. पुढे त्याची मार्गदर्शिका तयार करून शाळेकडे दिली व काही साहित्य दिले. पुढे ३० विद्यार्थ्यांनी सोलर कुकर शाळांमध्ये तयार केले, शालेय प्रात्यक्षिकात त्याचा वापर झाला.

यातून विद्यार्थी काय शिकले? असा प्रश्न समोर येतो. सौर ऊर्जा, पर्यावरण, वर्कशॉपमधील सुतार कामातील साधनांचा वापर, गुण्या ९० अंशाचा कोन दाखवितो - त्याचा वापर, सौर ऊर्जेचा प्रत्यक्ष उपयोग, काही कौशल्ये विद्यार्थी अशा उपक्रमातून शिकताना पाहायला मिळते.

याचा पुढचा भाग म्हणून सोलर ड्रायर तयार करणे व त्याचा वापर करून परिसरातील भाजीपाला सुकविणे ही स्पर्धा घेतली. २५ शाळांनी यात सहभाग नोंदविला. भाजी सुकविताना घेतलेली निरीक्षणे, करावी लागणारी क्रिया, या गोष्टी विद्यार्थ्यांनी केल्या. परंपरागत भाजी सुकविणे व ड्रायरचा वापर करून भाजी सुकविणे यातील फरक विद्यार्थी समजून घेत होते. त्याचा त्यांनी प्रकल्प अहवाल तयार केला. भाजी सुकविताना त्याचा रंग, वास, चव तीच मिखतेय ना? याचे परीक्षण आरती संस्थेचे श्री. हनबर देशमुख यांनी केले. परीक्षण करून प्रकल्पाचे क्रमांक काढले. पदार्थ टिकविण्याचे शास्त्र कसे घडते याची प्रचीती विद्यार्थ्यांनी घेतली.हे सर्व करताना पदार्थाचे निर्जलीकरण कसे होते याचा अभ्यास झाला. पदार्थ टिकविण्यासाठी निर्जलीकरण, खारविणे, तेलाचा वापर, इ. गोष्टी केल्या जातात याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला. खरे तर हे प्रकरण ३०ते४५ मिनिटांच्या तासिकेत शिकवून पूर्ण करता आले असते परंतु तसे न करता प्रकल्प पद्धती वापरून अध्ययन-अध्यापन झाले.

विज्ञानाच्या पाठ्य-पुस्तकातील ‘वनस्पती वाढ व विकास’ हा मुद्दा विद्यार्थी कृती-निरीक्षण करत करत प्रत्यक्ष या गोष्टी अनुभवातून शिकतात. शेती पशुपालन विभागात कुक्कुटपालन, नर्सरी तयार करणे, शेतात एखादे पिक घेणे या गोष्टी फक्त माहितीच्या पातळीवर न राहता प्रत्यक्ष अनुभवातून शिकताना विद्यार्थी कृती-कौशल्ये शिकतात. शेतात पिक घ्यावयाचे झाल्यास त्याचे मातीपरीक्षण करणे, त्यातील पी एच चे प्रमाण शोधणे, पिकानुसार खताचे प्रमाण ठरविणे या गोष्टी करताना विद्यार्थी आपल्या घरच्या परिस्थितीशी ताडून पाहतात. घरच्या शेतात यातील कोणते तंत्रज्ञान आपल्याला वापरता येईल याचा सारासार विचार विद्यार्थी करतात. नवीन गोष्टी करून पाहतात, त्यामुळे यातून त्यांच्यात नाविन्याचा अनुभव घेणे, अवघड गोष्ट करण्याचे साहस आणि आत्मविश्वास निर्माण होताना दिसतो.या शिक्षण पद्धतीने -माहिती-ज्ञान-उपयोजन या पातळीवर विद्यार्थ्यांना घेऊन जाता येते. मात्र यामध्ये कार्य अर्थात काम (work) केंद्र (center) स्थानी ठेवले आणि त्याच्या सभोवती विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनाशी जोडणाऱ्या गोष्टी शिकायला मिळतील अशी व्यवस्था केली .

शिक्षण हे दैनंदिन जीवनाचे प्रश्न सोडविण्याची कार्यशाळा व्हायला पाहिजे. म्हणजे शाळेतील गळतीचे प्रश्न कमी होतील, शाळा व समाज यांचे नाते तयार होईल. या गोष्टी फक्त विचाराच्या पातळीवर न राहता त्याचे प्रत्यक्ष दर्शन कार्यकेंद्रित शिक्षणाच्या माध्यमातून होईल असे वाटते. अनुभव- ज्ञान-कौशल्य-उपयोजन या गोष्टी शिक्षणातून वाढीस लावायच्या असतील तर शिक्षणाचा केंद्रबिंदू काम हाच असला पाहिजे.

**विकास कामातून शिक्षण –**

सध्या देशपातळीवर Skill Development Mission च्या माध्यमातून देशाला आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाचा पुरवठा कसा करता येईल याचा विचार केला जातोय. Demand and Supply ही पद्धती अवलंबिली जात आहे. हा शिक्षणातील मोठा धोका आहे. शिक्षण ही मनुष्यघडणीची प्रक्रिया असली पाहिजे हा विचार करणाऱ्या संस्था आपली स्वत:ची शिक्षणाची पद्धती वापरून काम करत आहेत. शालेय शिक्षण घेत असतानाच कौशल्ये शिकविली जाऊ शकतात, त्याच्या पुढे गावाच्या विकासात त्यांचे योगदान हे विज्ञान आश्रमाच्या शैक्षणिक प्रयोगाने दाखवून दिले आहे.

गाव – तंत्रज्ञान – शाळा असा त्रिकोण घेतला तर तंत्रज्ञान जर गावात पोहचवायचे असेल तर शाळा हे माध्यम खूप महत्त्वाचे आहे. विद्यार्थी शाळेत नवीन तंत्रज्ञान शिकतील तेही स्वत: काम करत. त्यामुळे त्यात आपलेपणा निर्माण होतो. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर किंवा सुटल्यावर देखील जे बरोबर येते ते तंत्रज्ञान, पुढे त्याचा वापर करताना पाहायला मिळते.

शिकताना देखील शिकायचे कसे याचे शिक्षण या कार्यकेंद्रित शिक्षणातून मिळते. कौशल्य-ज्ञान -उपयोजन – एकत्रित काम करणे – श्रमाला कमी न लेखणे – परपीडा समजणे अशी मानसिक घडण होत असल्याचे कार्यकेंद्रित शिक्षणाने दाखवून दिले आहे.

**शालेय विषय शिकविण्यासाठी कार्यकेंद्रित शिक्षणपद्धती –**

शालेय शिक्षणात जे विविध विषय शिकविले जातात, ते सर्व विषय कार्यकेंद्री पद्धतीने शिकविले जाऊ शकतात. त्यातून जीवनकौशल्ये, मूल्ये, श्रमप्रतिष्ठा, उद्योजकता, समाजोपयोगी सेवा, सर्जनशीलता, निरीक्षण क्षमता, समस्या निवारण आदी गोष्टी सहज शिकता येतात.

नुसती विषयाची माहिती न देता, विषय प्रत्यक्ष कृतीद्वारा शिकविण्यावर भर देणे गरजेचे आहे. शिक्षणाच्या बदलत्या प्रवाहात सर्वांनी परंपरागत खडू-फळा घेऊन शिकविणे ही पद्धत बदलून कार्यकेंद्रित पद्धतीने शिकविण्यावर भर देणे हे आपल्या सर्वांच्या हिताचे आहे.

श्री. ओंकार बाणाईत
फोन – ९७३०००५०२७ Email : vaibt100@gmail.com



## Website Links

शैक्षणिक धोरण, शासकीय परिपत्रके, शैक्षणिक प्रकाशने या संदर्भात अद्ययावत राहण्यासाठी पुढील संकेत स्थळांना भेट द्या.

http://www.mscepune.in/

https://mahahsscboard.maharashtra.gov.in/

https://www.maharashtra.gov.in/

http://www.balbharati.in/

http://www.mpsp.maharashtra.gov.in/SITE/Home/Home.aspx

http://www.dise.in/

http://mhrd.gov.in/

http://www.ncert.nic.in/



# ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र

पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
✆ २४२०७१९३, २४२०७१९४
E-mail: erc@jnanaprabodhini.org
Visit us at: www.erc-pune.org